# पुणे महानगरपालिका
# * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३०

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २३/१०/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. १४१७**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चा माहे सप्टेंबर २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/२९९१ दि.११/१०/२०१८ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १४१८**

मा.अमोल बालवडकर यांचे दि. ११/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.०९ बालेवाडी सर्व्हे नं.१४,१५ अ कम्फर्ट झोन सोसायटी नजीकच्या पुणे मनपाच्या ॲमिनिटी स्पेसवर क्रिडांगण व बगीच्या विकासित करणेसाठी र.रु.३६.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८–१९ चे अंदाजपत्रक, सीई२०बी१०१/टी१–१, प्रभाग क्र.०९ बालेवाडी गाव मुख्य चौक सुशोभीकरण करणे | ३६.५० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>प्रभाग क्र.०९ बालेवाडी सर्व्हे नं.१४,१५ अ कम्फर्ट झोन सोसायटी नजीकच्या पुणे मनपाच्या ॲमिनिटी स्पेसवर क्रिडांगण व बगीच्या विकासित करणे | --- | ३६.५० लाख |

**विषय क्र. १४१९**

मा.सम्राट थोरात यांचे दि. १६/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १८ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८–२०१९ चे अंदाजपत्रक | | |
| १) बजेट कोड RE19A153/SR11-71, प्रभाग क्र.१८ ड मधील गुरुवार पेठ परिसरामध्ये झाडण कामासाठी अकुशल मजूर पुरविणे. | १० लाख | --- |
| २) बजेट कोड RE19A153/SR11-72, प्रभाग क्र.१८ ड मधील विविध ठिकाणी झाडण कामासाठी अकुशल मजूर पुरविणे. | १० लाख | --- |
| ३) बजेट कोड RE19A153/SR11-73, प्रभाग क्र.१८ ड मधील मोमिनपुरा परिसरामध्ये झाडण कामासाठी अकुशल मजूर पुरविणे. | १० लाख | --- |
| ४) बजेट कोड RE19A153/SR11-74, प्रभाग क्र.१८ ड गंज पेठ परिसरामध्ये झाडण कामासाठी अकुशल मजूर पुरविणे. | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र.१८ ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व साफसफाई करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.१८ ड मध्ये विविध ठिकाणी शौचालय दुरुस्ती करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.१८ ड मध्ये ड्रेनेज लाईन साफसफाई करणे व नदनुषंगिक कामे करणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.१८ ड मध्ये ज्युट बॅग पुरवणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. १४२०**

मा.सम्राट थोरात यांचे दि. १६/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १८ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक | | |
| १) बजेट कोड CE22A548/SJ10-978, प्रभाग क्र.१८ ड मधील बेंचेस पुरविणे. | ५ लाख | --- |
| २) बजेट कोड CE20C352/SB5-1411, प्रभाग क्र.१८ ड मधील विविध ठिकाणी सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे. | १० लाख | --- |
| ३) बजेट कोड CE20 A103/SA13-731, प्रभाग क्र.१८ ड मधील फुटपाथ लाईटींग करणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र.१८ ड मध्ये गुरुवार पेठ खडकमाळ आळी व प्रभागामध्ये विविध ठिकाणी चेंबर सम पातळीवर घेणे व साफसफाई करणे. | --- | ५ लाख |
| २) प्रभाग क्र.१८ ड मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.१८ ड मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. १४२१**

मा.सौ.अनिता कदम यांचे दि. १६/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.३० क मध्ये येणा-या सर्व शाळा व इतर इमारतीमध्ये भारतीय मानक ब्युरो मानांकीत १ किलो , २ किलो, ५ किलो क्षमतेचे एचडीपीई ॲटोमॅटीक तथा मॅन्युअल फायर एक्सटींगुइसर बसविणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड : CE22A548/SJ10-1085, प्रभाग क्र. ३० मध्ये विविध ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी स्टेनस्टीलचे बेंचेस बसविणे | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र.३० क मध्ये येणा-या सर्व शाळा व इतर इमारतीमध्ये भारतीय मानक ब्युरो मानांकीत १ किलो, २ किलो, ५किलो क्षमतेचे एचडीपीई ॲटोमॅटीक तथा मॅन्युअल फायर एक्सटींगुइसर बसविणे | -- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १४२२**

मा.सौ.सुलोचना कोंढरे व मा.महेश लडकत यांचे दि. १६/१०/२०१८ चे पत्र.

दि.०५ ऑक्टोबर २०१८ रोजी पुणे शहरामध्ये एक अत्यंत दुर्देवी घटना घडली मंगळवार पेठ येथील कामगार पुतळा चौकात दुपारी १.४५ मि. रस्त्याच्या बाजूला असलेले होर्डिंग ते सिग्नल ला उभे असणा-या पुणेकरांच्या अंगावरती पडून ४ नागरिंचा अपघाती मृत्यू झाला व अनेक नागरिक गंभीर जखमी झाले.

अपघातामध्ये मृत्यू झालेल्या कुटुंबियांचे सांत्वन राजकीय व सामाजिक घटकातील सर्व नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी केले.

पुणे म न पा सुध्दा जखमी व मृत कुटुंबियांच्या दु : खामध्ये सहभागी आहे .त्यांचे हया दु: खात सहभागी होत असताना पुणे मनपाने जखमी व मृत कुटुंबियांना जास्तीत जास्त आर्थिक मदत करावी.

**विषय क्र. १४२३**

मा.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. १६/१०/२०१८ चे पत्र.

संदर्भ - १.रिट याचिका क्र ५५/२००३ व ५७२/२००३ मध्ये सर्वोच्च न्यायालय चे दि ११.११.१६ चे आदेश

२.नागरी बेघरांना निवारा समितीचे मुख्य सचिव महाराष्ट राज्य यांना लिहलेले पत्र D.O.No.N11028/8/2014-USD(Vol-V)/FTS-1691 Dt 18.5.17

**संदर्भ १ नुसारच्या रिट याचिकेवर दि ११.११.१६ रोजी आदेश देताना सर्वोच्च न्यायालयाने, न्यायमूर्ती गंभीर यांच्या अध्यक्षते खाली समिती स्थापन करून प्रत्यक्ष सर्वनिवारा प्रकल्प यांना भेट देऊन निवारे NULM निर्देशानुसार चालविण्यासाठी व आवश्यक ते निर्देश संबंधीत राज्य शासनास द्यावेत असा निर्णय दिला.यावर या समितीने पुणे शहरातील रात्रनिवारा व घरटे प्रकल्प यांना भेट दिल्या.यावेळी सर्व निवारे NULM अंतर्गत समाविष्ट करण्याचे निर्देश दिले व त्यानुसार कृती अहवाल मागविला. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने शासनास कृती अहवाल (Plan of Action) तत्कालीन मुख्य समाजविकासअधिकारी यांच्या सहीने दि.६.५.१७ रोजी सादर केला होता. याबाबत सविस्तर माहिती शासनाच्या संकेत स्थळावर https://nulm.gov.in आहे.यामध्ये shelters या उपविभागत यावरील सविस्तर अहवाल आहे.**

**न्यायमूर्ती गंभीर यांच्या समितीने दि १८.५.१७ रोजी मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांना संदर्भ २ च्या पत्राने सर्व निवारे प्रकल्प हे NULM अंतर्गत समावेश करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने NULMअंतर्गत सध्या चालू असणाऱ्या रात्र निवाराप्रकल्प व घरटे प्रकल्प यांचा DPR शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला.विशेष म्हणजे दोन संस्थाचे DPR राज्य शासनाकडून मंजूर झालेले आहेत.अन्य निवारांसाठी निधी देण्यास शासन तयार आहे. सदर निधी घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेने प्रयत्न केलेला दिसून येत नाही.**

**राज्य शासनाकडेDPRमंजूरीसाठी पाठविल्यानंतर त्यावरील प्रक्रिया पूर्ण होण्याअगोदरच रात्र निवारा प्रकल्प व घरटे प्रकल्पाच्या स्वारस्य अभिव्यक्ती मागवल्या सदर निविदाNULM निर्देशानुसार नसल्यामुळे या स्वारस्य अभिव्यक्ती बेकायदेशीर असल्याचे व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग करणारी असल्याचे मा.आयुक्त पुणे महापालिका व मुख्य समाज विकास अधिकारी पुणे महानगरपालिका यांच्या वारंवार निदर्शनास आणलेआहे.त्यानंतर दोन वेळा बेकायदेशिर रित्या काढलेल्या घरटे प्रकल्पाच्या स्वारस्य**अभिव्यक्ती **रद्द देखील केल्या आहेत.**

**सदर प्रस्तावामध्ये खालील बार्बीवर विचार करूनच पुढील कार्यवाही करण्यात यावी.**

**१. सदर प्रस्तावात युवक कल्याणकारी निधी अंतर्गत रू १ कोटी उपलब्ध असून रात्रनिवारा प्रकल्पासाठी खर्च करणेस प्रस्तावित आहे सदरची बाब सर्व सामान्य पुणेकरांच्या हित विरोधी असून त्यांच्या कर रूपी पैश्याची उधळपट्टी करणारे आहे.वास्तविक सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व निवारे प्रकल्प दिवस रात्र प्रकल्प (२४तास) करणे बंधनकारक असून त्याचा संपूर्ण खर्च केंद्र व राज्य सरकारने करावयाचा आहे.सबब पुणे महापालिकेने याबाबीवर खर्च करणे संयुक्तिक नाही.**

**२. सदर प्रस्तावातील मुद्दा क्र ७ नुसारच त्वरीत कार्यवाही करणे अपेक्षित असून राज्य शासनाकडे प्रलंबीत असलेले DPR मंजूर करून आणण्याचे आदेश प्रशासनाला द्यावेत व मंजूर DPR व NULM निर्देशानुसारच पुणे शहरातील सर्व निवारे प्रकल्प राबविण्यात यावेत.**

**३.प्रशासनाकडून सदर प्रकरणी सादर करण्यात आलेल्या** स्थायी समिती विषय क्र.१०९२ मधील मुद्दा क्र.६ मध्ये मा.अतिरिक्ति महापालिका आयुक्त (वि) यांचे वतीने अधिकार मुख्य समाज विकास अधिकारी समाज विकास विभाग यांना प्रकल्प राबविताना प्रत्यक्ष परिस्थितीनुसार आवश्यक त्या योजनेची अंमलबजावणीचे तसेच आवश्यक प्रकल्पाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाहीमध्ये बदल करण्याचे अधिकार देण्याचे नमूद असून सदर अधिकार मा.अतिरिक्ति महापालिका आयुक्त (वि) यांजकडेच ठेवण्यात यावेत.

**वरील सर्व बाबींचा विचार करून** स्थायी समिती विषय क्र.१०९२ पुणे शहरात रात्र निवारा प्रकल्प राबविणे या विषयाचा फेरविचार करून वरीलप्रमाणे बदल करून विषय मान्य करण्यात यावा.

विषय क्र. १४२४

मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. १६/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३० अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक | | |
| १)बजेट कोड - सीई२०अे१२६/एसअे१५-१६५०, प्रभाग क्र.७ ब मध्ये मुळा रोड संगमवाडी वाकडेवाडी विविध ठिकाणी स्टँम्प काँक्रीट करणे. | १० लाख | --- |
| २) बजेट कोड - सीई२०अे१२६/एसअे१५-१६४९, प्रभाग क्र.७ ब मध्ये मॅरियट चौक व शिवाजी हौ.सोसायटी रस्ते स्टँम्प काँक्रीट करणे. | १० लाख | --- |
| ३) बजेट कोड - सीई२०अे१२६/एसअे१५-१६४७, प्रभाग क्र.७ ब मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळात फरशी बसविणे व काँक्रीट करणे. | १० लाख | --- |
| ४) बजेट कोड - सीई२०अे१०३/एसअे१३-६२१, प्रभाग क्र.७ ब मध्ये गोखले नगर जनवाडी निलज्योती फुटपाथ स्टँम्प काँक्रीट करणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र.३० अ पानमळा येथील शौचालय दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.३० अ जनता वसाहत मधील शौचालय दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.३० गल्ली क्र.५० ते ७० मधील शौचालय दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.३० अ दांडेकर पूल जवळील शौचालय दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. १४२५**

मा.हरिदास चरवड यांचे दि. १७/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.३३ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, अ भाग- ४ खास निधी जमा व खर्चाचे अंदाजपत्रक, यादी क्र. एसडी२ बजेट कोड झेडई१६बी१०२/एसडी२-२३५१, प्रभाग क्र. ३३ अ वडगाव बुद्रुक स्मशानभूमी मागे गोसावी वस्ती मागे पाईप कल्व्हर्ट बांधणे | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र.३३ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे | -- | १० लाख |

**विषय क्र. १४२६**

मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. १७/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ क मध्ये भवन विभाग अंतर्गत विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, सीई२७ए२४१/एसजे२४-३३९, प्रभाग क्र. १९ क मधील अरूणकुमार वैद्य स्टेडियम येथे विकास कामे करणे | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र. १९ क मध्ये भवन विभाग अंतर्गत विविध विकास कामे करणे | -- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १४२७**

मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. १७/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ क मध्ये पथ विभाग अंतर्गत विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, सीई२७ए२४१/एसजे२४-३४०, प्रभाग क्र. १९ क मधील अरूण कुमार वैद्य स्टेडियम येथील अर्धवट जिमचे काम पूर्ण करणे | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र. १९ क मध्ये पथ विभाग अंतर्गत विविध विकास कामे करणे | -- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्र. १४२८**

पुणे महानगरपालिकेच्या विविध जलकेंद्रामध्ये, मैलापाणी शुध्दीकरण केंदामध्ये ९०० के.जी. कंटनर्समध्ये द्रवरुप क्लोरीन वायू (IS 646:1986 नुसार) – मे.सार्क/जीएसीएल/ग्रासिम/एनआरसी/एचओसी/मे.मेघमणी फाईन केम लि. (MFL)/ मे.डी.सी.एम. श्रीराम/मे.द आंध्रा शुगर्स लि. कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ४ निविदांपैकी पुढील ३ निविदाधारक मे.केमिकल पीपल, मे.रंगरसायन, पुणे व मे.आयडीयल केमिकल्स (इं) प्रा.लि., ठाणे यांचेकडून र.रुपये ८,६१९/– प्रति मे.टन सर्व करांसह या दराने अनुक्रमे ५०:३०:२० नुसार खरेदी करण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/५९३ दि. ११/१०/२०१८ चे पत्र.

१) मे.केमिकल पीपल, मे.रंगरसायन, पुणे व मे.आयडीयल केमिकल्स (इं) प्रा.लि., ठाणे यांचेकडून र.रुपये८,६१९/– प्रति मे.टन सर्व करांसह या दराने अनुक्रमे ५०:३०:२० नुसार ९३९ मे.टन (मे.केमिकल पीपल), ५६३.४ मे.टन (मे.रंगरसायन) व ३७५.६ मे.टन (मे.आयडीयल केमिकल्स (इं) प्रा.लि., ठाणे) या प्रमाणे एकुण १८७८ मे.टन क्लोरीन वायूसाठी एकूण र.रुपये १,६१,८६,४८२/– पर्यंत खरेदी करणेस
२) क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खरेदीसाठी करारनामा करणेस व अनामत भरुन घेणेस.
३) वरीलप्रमाणे खरेदी केलेल्या परिमाणाचे बिल पुरवठादारास आदा करणेस.

**विषय क्र. १४२९**

Implementation of Grid Connected Rooftop Solar PV System on the Roofs of PMC Building with 5 years Comprehensive Operation and Maintenance (बी–२ पध्दत) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पी.ॲण्ड एन.इंजिनिअरिंग ॲण्ड मार्केटिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून निविदा अटी व शर्तीनुसार तडजोडीचे दरानुसार प्रोजेक्ट कॉस्ट (५ वर्षासाठी नि:शुल्क क्रॉम्प्रिएन्सिव ऑपरेशन व मेंटेनन्ससहित) र.रुपये ४,९५,००,०००/– पर्यंत काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६०८ दि. १६/१०/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १४३०**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३१**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३२**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३३**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३५**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३६**

पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या प्रस्ताव व प्रकल्पाच्या अद्ययावत माहिती व औंध, बाणेर आणि बालेवाडीच्या क्षेत्र वाढीबाबत मा.अमोल बालवडकर, मा.विजय शेवाळे व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१०१ दि. १२/२/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/उआ(वि)/५२८ दि.२५/९/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ अ मध्ये सुधारीत राजपत्रानुसार खालील प्रमाणे बदल झालेला आहे.

१. ६०० चौ. फूटपर्यंतचे निवासी अनाधिकृत बांधकामास शास्तीची कर आकारणी न करणेस.
२. ६०१ ते १००० चौ. फुटापर्यंत चे निवासी अनाधिकृत बांधकामास प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५०% दराने शास्तीची कर आकारणी करणेस.
३. १००१ चौ. फुटापुढील निवासी अनाधिकृत बांधकामास प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्तीची कर आकारणी करणेस.

उपरोक्त प्रमाणे नमूद चौ. फुटा पर्यंतचे निवासी बांधकामास शास्तीची आकारणी करण्याबाबत दुरुस्ती आली असल्याने, याप्रमाणे दिनांक ०४.०१.२००८ पासून वरील अ.क्र. १ व २ मधील नमूद चौ. फुटा पर्यंतचे निवासी बांधकामास दुप्पटी इतकी शास्तीची आकारणी करण्यात आलेली आहे. त्यांना मा. मुख्य सभा मान्यता दिलेल्या दिनांकापासून सुधारित दराने शास्ती आकारण्यास.

वर नमूद केलेले बदल विचारात घेता कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींना योग्य ती सवलत (Relief) देण्यात येत आहे. तसेच मान्यता प्राप्त नकाशाप्रमाणे बांधकाम झालेले असल्यास, खात्याचा अभिप्राय घेवून तीनपट शास्ती लावण्यात येत नाही. त्यामुळे सद्यस्थिती प्रमाणे कार्यवाही चालू राहिल्यास अनाधिकृत बांधकामास आळा घालणे शक्य आहे.

तथापि, कलम २६७ अ मध्ये झालेले वरील बदलाबाबतचे अधिकार मा. मुख्य सभेस असल्याने, सदरची बाब मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेचे निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/४९७ दि.१४/९/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३८**

श्री.मुलाणी इसाक बाबुलाल, लघुलेखक, प्राथमिक शिक्षण विभाग यांचे वेतनश्रेणीबाबत मा.योगेश समेळ व मा.अविनाश बागवे यांचे दि. २/५/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १०२ दि. २/५/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शिमं/७५१ दि.५/१/२०१८ ने पाठविलेल्या अभिप्रायावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १८२४ दि. १६/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/शिमं/४६२ दि.१०/९/२०१८ ने पाठविलेला फेर अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३९**

पुणे पेठ शुक्रवार घरांक ६६९ येथील मॅटर्निटी होम (MH-1) करिता आरक्षित क्षेत्राचे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/५७५ दि.८/१०/२०१८ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१०/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १४४०**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाचे सुयोग्य नियोजन व अमलबजावणी होणेकरीता स्वच्छतेच्या बाबतीत पुणे महानगरपालिकेची प्रतिमा उंचविणेकरीता मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन वापर शुल्कास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/६०९ दि.१६/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १४४१**

उद्यान विभागाकडील तज्ञ आर्किटेक्ट पॅनेलमधील सुचीमध्ये तज्ञ लॅण्डस्केप आर्किटेक्ट मे.राजमुद्रा आर्किटेक्टस ॲण्ड लॅण्डस्केप डिझायनर्स चे आर्किटेक्ट किरण हि.भामरे यांचे नावाचा समावेश करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/६११ दि.१६/१०/२०१८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**